| CNR-MHYA110000032000 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक : | २०.०५.२००० |
| | नोंदणी दिनांक : | २०.०५.२००० |
| | निकाल दिनांक : | १३.०३.२०२६ |
| | कालावधी : | २५–व ९–म २४–दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र. १, उमरखेड यांचे न्यायालयात**

**पिठासीन अधिकारी श्रीमती आर.ए.ए.खतीब**

**नियमीत फौजदारी खटला.क्र. ३६/२०००**        **निशाणी क्र. ६७**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन, उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ. |
| उपस्थिती | सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता, श्री. एस. एन. नाईक |
| आरोपी | **१. जावेद अहमद गुल मोहमद,**<br>वय : २८ वर्षे, धंदा : शिक्षण,<br>रा. सोयट, कुलगांव जि. अनंतनाग (कश्मीर)<br><br>**२. मंजुर अहमद अब्दुल गणी भट,**<br>वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण ,<br>रा. झुंगलमोरा कुलगांव जि. अनंतनाग (कश्मीर)<br><br>**३. झहुर मोहमद अब्दुल गणी झर,**<br>वय : २८ वर्षे, धंदा : शिक्षण ,<br>रा. झुंगलमोरा कुलगांव जि. अनंतनाग (कश्मीर)<br><br>**४. मोहमद युसुफ मोहमद सैदुल्लाह**<br>वय : २८ वर्षे, धंदा : शिक्षण ,<br>रा. सोयट, कुलगांव जि. अनंतनाग (कश्मीर) |
| | **आरोपी फौ.प्र.सं.कलम–२९९ नुसार फरार** |

**नमुना ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | दि. ०५/०१/२००० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | दि. ०५/०१/२००० |
| दोषारोप दिनांक | (आरोपी फौ.प्र.सं.कलम–२९९ नुसार फरार) |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | दिनांक १२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | ------------निरंक------------- |
| न्यायनिर्णय तारीख | दिनांक १३/०३/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | -----------निरंक---------------- |

**नमुना क**

| **अ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक** | **कलम** | **निर्दोष किंवा दोषी** | **शिक्षा** | **फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जावेद अहमद गुल मोहमद | ०६.०१. २००० | ०६.०१. २००० | हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ | दोषमुक्त | निरंक | निरंक |
| २ | मंजुर अहमद अब्दुल गणी भट | ०६.०१. २००० | ०६.०१. २००० | हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ | दोषमुक्त | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | झहुर मोहमद अब्दुल गणी झर | ०६.०१. २००० | ०६.०१. २००० | हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ | दोषमुक्त | निरंक | निरंक |
| ४ | मोहमद युसुफ मोहमद सैदुल्लाह | ०६.०१. २००० | ०६.०१. २००० | हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ | दोषमुक्त | निरंक | निरंक |

**नमुना ड**

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**अ– सरकारी साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | नितीनकुमार सुरेशचंद्र भुतडा | पंच |

**ब– बचावपक्ष साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी कागदपत्रे**

**अ–सरकारी**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र. ६५ व ६६ | घरझडती व जप्ती पंचनाम्यावरील सही |

**ब–बचावपक्ष**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड–जप्त मुद्देमाल**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | लोखंडी गुप्ती धारदार |
| २ | – | लोखंडी धारदार गुप्ती |
| ३ | – | एक लाकडी गोळाकार गुप्ती ठेवण्याची मॅन |

**<u>न्यायनिर्णय</u>**

**<u>(पारीत दिनांक १३/०३/२०२६)</u>**

आरोपी हा हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ कायद्या अंतर्गतचे खटल्यास सामोरे जात आहे.

२) अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की, फिर्यादी नामे कांताराव व्यंकटी भुत्तेवाड यांनी दिनांक ५.०१.२००० रोजी पोलीस स्टेशन उमरखेड येथे तक्रार दिली की, अर्जदार नामे हरी राजाराम खोकले रा. उमरखेड यांच्या अर्जाच्या चौकशीकामे सोबत पोलीस कॉस्टेबल ब.नं. १४०, ६४६ व १६५० असे शासकीय गाडीने अर्जदाराने दाखविल्याप्रमाणे शिरडकर यांच्या खोलीसमोर जाऊन आवाज दिला व त्यांना नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे जावेद अहमद गुल मोहमद, मंजुर अहमद अब्दुल गणी भट, झहुर मोहमद अब्दुल गणी झर, मोहमद युसुफ मोहमद सैदुल्लाह असे सांगितले. त्यानंतर त्यांना घरझडती घेण्यामागचा उद्देश समजुन सांगितला असता त्यांच्या खोलीची दांन पंचनासमक्ष घर झडती घेतली असता त्यांच्या

खोलीमध्ये(गुपती) दोन धारदार शस्त्र मिळुन आल्या. जप्ती पंचनामा करुन अहवाल दाखल केला. करिता फिर्याद.

३) सदर तक्रारीवरुन पोलीस स्टेशन उमरखेड यांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक ३००२/२००० हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ अन्वये नोंदविण्यात आला. स.पो.नि. श्री. जी. आर. चौधरी यांनी घटनेचा पुढील तपास केला. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोपीविरुध्द हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

४) अभिलेखावरील तक्रार व कागदपत्रे पडताळुन मी आरोपीविरुध्द हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. परंतू आरोपी हा फरार असल्यामुळे त्याच्याविरूदध फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा नोंदविण्यात आला.

५) अभियोग पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. एस. एन. नाईक** यांच्या युक्तीवादावरुन व अभिलेखावरुन खालील वादप्रश्न विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद कारणांमुळे नोंदविले आहेत.

| अ.क्रं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०५/०१/२००० रोजी मौजे. रवि शिरडकर यांच्या घरी सरदार पटेल वार्ड, उमरखेड, ता. उमरखेड, जि. | |

| | | |
|---|---|---|
| | यवतमाळ येथे आरोपी हे त्यांच्या ताब्यात धारदार शस्त्र बाळगुन होते व त्याद्वारे हत्यार का. कलम ४/२५ अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | **...नाही.** |
| २. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख व ठिकाणी आरोपींना जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या आदेशाचे उल्लंघन करुन व त्याद्वारे मु. पो. का. कलम ३६/१३४ नुसार गुन्हा केला काय ? | **...नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपींना दोषमुक्त करण्यात येत आहे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**६)** आरोपींवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने पंच अ.सा.क्र.१ नितीनकुमार सुरेशचंद्र भुतडा यांना निशाणी क्र. ३६ वर तपासण्यात आले. मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये जुने प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याचे निर्देशित केलेले आहे. इतर साक्षीदारांना वारंवार साक्षीसमन्स व वारंट काढून सुध्दा हजर होत नसल्याने दिनांक १२.०३.२०२६ रोजी निशाणी क्र.०१ वर आदेश पारीत करून सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुददा क्रमांक १ व २ करिता</u> –**

**७)** पंच अ.सा.क्रं.१ नितीनकुमार सुरेशचंद्र भुतडा यांनी त्यांच्या

सरतपासात असे सांगीतले आहे की, तो आरोपींना व फिर्यादीला ओळखत नाही. त्यांना पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. ते त्यांच्या कामासाठी पोलीस स्टेशनला गेले तेंव्हा पोलीसांनी त्यांची सही घेतली. जप्ती पंचनामा व घरझडती पंचनामावर त्यांची सही अनुक्रमे नि क्र. ६५ व ६६ आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनेस सहाय्य केले नसल्याने त्यास फितूर घोषीत करुन सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, त्यादरम्यानही त्याने अभियोग पक्षाच्या कथनेस पुरक होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचे कथन ख-या अर्थाने सिध्द झालेले नाही.

८) अभियोग पक्षाचे साक्षी पुराव्याचे व फिर्यादचे अवलंबन केले असता अभियोग पक्षातर्फे फिर्यादी व ईतर साक्षीदार तसेच तपासीक अमलदार यांना वारंवार साक्षसमन्स व वारंट काढुन सुद्धा अभियोग पक्ष त्यांची साक्ष नोंदवण्यास असफल ठरले. तसेच अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार नितीनकुमार भुतडा यांना तपासण्यात आले परंतु ते फितुर झाल्याने त्याची साक्ष ग्राह्य धरता येणार नाही. सदरील प्रकरण हे फिर्यादीची साक्ष नोंदवण्यात आली नाही म्हणुन फिर्याद सिद्ध झाली नाही. तसेच सदरील प्रकरण हे २५ वर्षापेक्षा जुने असुन भविष्यात त्यांची साक्ष नोंदवणे अशक्य दिसत असल्याने नि क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. फक्त पंचांना साक्षेवर अवलंबुन राहुन आरोपी हे विना परवाना धारदार शस्त्र बाळगुन होते व त्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या आदेशाचे उल्लंघन केले हे सिद्ध होत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुददा क्रमांक ३ करिता</u> –

१)    वरील पुराव्यावरुन आरोपीच्या विरुद्ध गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे, एकंदरीत अभिलेखावरील पुरावा पाहता, अपु–या पुराव्या अभावी आरोपीची दोषमुक्तता करण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याने मी मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे. जप्त मुद्देमाल एक लोखंडी गुप्ती धारदार, लोखंडी धारदार गुप्ती, एक लाकडी गोळाकार गुप्ती ठेवण्याची मॅन हे शस्त्र असल्याने अपील कालावधीनंतर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे पाठवण्यात यावे व मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ ते ४ हे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे फरार असल्यामुळे त्याला हत्यार का. कलम ४/२५ व मु. पो. का. कलम ३६/१३४ अन्वये या गुन्हयातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल एक लोखंडी गुप्ती धारदार, लोखंडी धारदार गुप्ती, एक लाकडी गोळाकार गुप्ती ठेवण्याची मॅन अपील कालावधीनंतर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे पाठवण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RUBINA ANJUM AMJADUDDIN KHATEEB
Date: 2026.03.13 17:05:57 +0530

**(आर.ए.ए.खतीब)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
उमरखेड.

दिनांक १३/०३/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order/judgment are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | A. A. Dake |
| Name of Court | Smt.R.A.A.Khateeb, Jt. C.J.J.D & J.M.F.C. Umarkhed |
| Date of Dictation | 13/03/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 13/03/2026 |
| Judgment uploaded on | 16/03/2026 |